उन्माद आणि बेपर्वाई...

स्टेटलाइन

डॉ. सुकृत खांडेकर

रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाने पंजाब किंग्जला हरवून तब्बल १८ वर्षांनंतर आयपीएलचा चषक जिंकल्यावर सर्व देशात फटाके वाजले. मध्यरात्रीपर्यंत देशातील कोट्यवधी क्रिकेट प्रेमी टीव्हीच्या पडद्यावर प्रत्येक चेंडूनंतर काय होणार हे मोठ्या उत्सुकतेने पाहत होते. अगदी शेवटच्या षटकापर्यंत ही उत्सुकता कायम होती. केवळ बंगळूरुच नव्हे तर महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छ. संभाजीनगर, अहिल्यानगरमध्ये जल्लोष झाला. दिल्लीपासून गल्लीपर्यंत क्रिकेटप्रेमींनी विराटचा जयघोष केला. आदल्या रात्री विजय मिळवला व दुसऱ्याच दिवशी बंगळूरुमध्ये विजयी टीमच्या जंगी स्वागताचा सोहळा ठरविण्यात आला. बंगळूरुच्या विधानसौध ते चिन्नास्वामी स्टेडियमपर्यंत विजयी मिरवणूक, विधानसौधमध्ये सत्कार आणि स्टेडियमवर हजारो लोकांच्या साक्षीने विजयी सोहळा असा कार्यक्रम ठरविण्यात आला. मुळातच हा कार्यक्रम घाईघाईने ठरवला गेला. इतक्या कमी वेळात त्याचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था व विजयोत्सवाची तयारी शक्य होती काय? याचा रॉयल चॅलेंजर्स, कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशन आणि राज्यात सत्तेवर असलेल्या सिद्धरामय्या सरकारनेही कोणताच गांभीर्याने विचार केला नसावा. आपल्या राज्याचा संघ १८ वर्षांनी आयपीएल जिंकला, त्याच्या विजयाचे श्रेय आपणच घेतले पाहिजे, तेही झटपट आणि लगेचच असा विचार त्यांनी केला असावा. कारण या संघातील विराट कोहलीसह अन्य खेळाडूंना लगेचच कुठे ना कुठे बाहेर जायचे होते...

चिन्नास्वामी स्टेडियम हे बंगळूरुच्या अतिशय गजबजलेल्या भागात आहे. स्टेडियमची प्रेक्षकांची क्षमता पस्तीस हजार आहे. विराटची विजयी टीम तिथे येण्यापूर्वीच स्टेडियममध्ये साठ-सत्तर हजार लोक घुसले होते आणि स्टेडियमबाहेर किमान तीन ते साडेतीन लाखांची खचाखच गर्दी होती. तीन-चार लाख लोकांना नियंत्रणात ठेवण्यासाठी तेथे केवळ चौदाशे पोलीस होते. आपल्या विजयी टीमला बघण्यासाठी आलेल्या महाप्रचंड गर्दीला कोणालाही आवरणे शक्य झाले नाही. स्टेडियममध्ये क्षमतेपेक्षा दुप्पट लोक घुसल्यामुळे स्टेडियमचे सर्व दरवाजे बंद करण्यात आले होते, त्याचा परिणाम दरवाजे तोडून लोकांनी आत घुसण्याचा प्रयत्न केला. मग दुसरे काय होणार... तुफान चेंगराचेंगरी, तुडवातुडवी... त्यात अकरा जणांचा बळी गेला आणि पन्नासहून अधिक जखमी झाले. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाच्या विजयोत्सवाला गालबोट लागले. विजयोत्सवाचे शोकांतिकेत रूपांतर झाले...

भारताने पाकिस्तानवर हवाई व क्षेपणास्त्रांचे हल्ले करून एका रात्रीत दहशतवादी तळ नेस्तनाबूत केले, शंभर दहशतवादी यमसदनाला पाठवले. पाकिस्तानच्या हवाई तळांचे प्रचंड नुकसान झाले, शस्त्रसंधी झाल्यावर भाजपाने देशभर ऑपरेशन सिंदूर यात्रा काढल्या, विजयोत्सव साजरा केला पण कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. युद्धातील विजयानंतर, निवडणुकीच्या निकालानंतर किंवा खेळातही चषक जिंकल्यानंतर देशात-विदेशातही विजयी मिरवणुका निघतात. विजयीवीरांना प्रत्यक्ष बघायला मिळावे म्हणून विजयोत्सव पाहण्यासाठी हजारो-लाखो लोक जमतात पण नियोजन नसेल किंवा गर्दीला उन्माद चढला असेल, तर त्याच विजयाला गालबोट लागते अशीही अनेक उदाहरणे आहेत. याच वर्षी उत्तर प्रदेशात प्रयागराज येथे कुंभमध्ये संगमात स्नान करण्यासाठी कोट्यवधी भाविक आले होते. पण २९ जानेवारी रोजी लाखोंच्या चेंगराचेंगरीत ४० जणांचा मृत्यू झाला व ६० जखमी झाले. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवर झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला व १५ जखमी झाले. यातले बहुतेक प्रयागराजला जाणारे होते. दि. ३ मे २०२५ रोजी गोव्यात देवीच्या उत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू झाला व १०० जखमी झाले. गर्दीवर नियंत्रण ठेवता न आल्याने या दुर्घटना घडल्या.

अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने १९७१ मध्ये वेस्ट इंडिजच्या विरोधात कसोटी मालिका प्रथमच जिंकली. भारतीय टीम मुंबईत आली तेव्हा तिच्या स्वागताला सांताक्रूझ विमानतळावर भल्या पहाटे हजारो लोक जमले होते. या टीमची खुल्या बसमधून मिरवणूक निघाली व रस्त्यावर दोन्ही बाजूंनी उभ्या असलेल्या हजारो मुंबईकरांनी आपल्या विजयीवीरांवर पुष्पवृष्टी केली.

कपिल देवच्या नेतृत्वाखाली १९८३ मध्ये भारतीय संघाने वन डे विश्वचषक जिंकला. तेव्हा भारतीय टीमची मुंबईत विजयी मिरवणूक निघाली होती. सन २००७ मध्ये महेंद्र सिंग धोनीच्या नेतृवाखाली भारतीय संघाने टी-२० विश्वचषक जिंकला, त्यानंतरही मुंबई विमानतळावरून वानखेडे स्टेडियमपर्यंत विजयी मिरवणूक निघाली होती. सन २०११ मध्ये टीम इंडियाने मुंबईतच विश्व चषक जिंकला तेव्हाही मुंबईत क्रिकेट प्रेमींनी मोठा उत्सव साजरा केला होता. सन २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने

टी-२० विश्वचषक जिंकून मुंबईत परतल्यावर याच शहरात मोठी विजयी मिरवणूक निघाली होती. या मिरवणुकीत तर चार-पाच लाख सहभागी झाले होते. मरिन डाइव्हवर एवढी गर्दी होती की नेहमी दहा मिनिटांचे अंतर कापण्यासाठी टीम इंडियाला चार तास लागले. गर्दीत धक्काबुक्कीत काहींना किरकोळ दुखापत झाली किंवा काहींची श्वास कोंडला त्यांना त्वरित वैद्यकीय उपचार मिळाले. लाखोंच्या गर्दीतही एक रुग्णवाहिका जात असताना लोक वाट करून देत होते, असे व्हीडिओ व्हायरल झाले होते. मुंबईत सुरळीतपणे पार पडले ते बंगळूरुला का जमले नाही? मुंबई पोलीस, मुंबई क्रिकेट असोसिएशन, राज्य सरकार, मुंबई महापालिका यांच्यात असलेला समन्वय हा महत्त्वाचा होता. मग बंगळूरुमधील अशा यंत्रणांमध्ये परस्पर सुसंवाद, समन्वय नव्हता की फाजिल आत्मविश्वास सरकार, पोलीस व प्रशासनाला नडला?

बंगळूरु पोलिसांनी चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर झालेल्या चेंगचेंगरीत अकरा जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी रॉयल चॅलेजर्स बंगळूरु, डीएनए इव्हेंट मॅनेजमेंट प्रा. लि. आणि कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशन यांच्या विरोधात गुन्हे नोंदवले आहेत. रॉयल चॅलेजर्सच्या चार व डीएनए इव्हेंट कंपनीच्या तीन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांनी तर बंगळूरुचे पोलीस कमिशनर बी. दयानंद व चार वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक (इंटेलिजन्स) हेमंत निंबाळकर यांची तत्काळ बदली केली आहे. एवढेच नव्हे तर मुख्यमंत्र्यांचे राजकीय सचिव के. गोविंदराज यांना पदावरून मुक्त केले आहे. बंगळूरु दुर्घटनेचा तपास सीआयडीकडे सोपवला असून न्यायालयीन चौकशीचे आदेश निघाले आहेत.

विराट कोहलीच्या टीमच्या विजयी मिरवणुकीला व स्टेडियममधील विजयोत्सवाला हजर राहण्यासाठी किती लोक येतील याचा अंदाज पोलिसांना बांधता आला नाही. चार लाख लोक जमले याची कुणी कल्पनाही केली नव्हती. हे सर्व लोक, तरुण मुले, विद्यार्थी घरी किंवा ऑफिसमध्ये सांगून सवरून किंवा सुट्टी रजा घेऊन आले होते का? आपले कामधंदे सोडून ही लाखोंची गर्दी आपल्या हिरोंना बघायला जमते याचा दुसरा अर्थ काय? हे सर्व कामधंदे, नोकरी, नसलेले लोक होते का? बंगळूरु हे देशातील मोठे आयटी सीटी आहे.

कॉर्पोरेट कंपन्यांची तिथे मोठी गर्दी आहे. मग या शहराला किमान शिस्त, नियोजन, सुरक्षितता काहीच नाही का? आयपीएल चषक जिंकल्यावर बंगळूरुला घाईघाईने विजयोत्सव साजरा करण्याचा निर्णय कुणाचा? विजयी मिरवणूक व स्टेडियममध्ये विजयोत्सव कुणी ठरवला? पोलिसांकडे परवानगीसाठी अर्ज कुणी केला? पोलिसांनी विजयोत्सवाला व मिरवणुकीला नकार दिला असताना त्यांच्यावर दबाव कोणी आणला? दि. ३ जून बुधवार ऐवजी ८ जून रविवारी विजयोत्सव साजरा करावा अशी सूचना पोलिसांनी केली असताना पुन्हा ३ जून (वर्किंग डे) चा हट्ट कोणाचा? स्टेडियमवर विजयोत्सवासाठी मोफत पास वेबसाईटवर मिळतील असे आवाहन कोणी केले? स्टेडियमबाहेर तीन-चार लाख लोकांची अनियंत्रित गर्दी असताना विधानसौधमध्ये सत्कार समारंभ कसा चालू होता? पोलिसांची संख्या, रुग्ण वाहिका, औषधोपचार, वाहतूक नियंत्रण, ही सारी इव्हेंट मॅनेजमेंट कुठे होती? उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यामार्फत आरसीबीचे पदाधिकारी पोलिसांवर दबाव आणत होते हे खरे काय? विजयोत्सवासाठी वेळ अपुरा आहे, असे पोलीस सतत सांगत असताना त्यांची सूचना धुडकावण्याचे काम सरकारमधील कुणाचे? निलंबित पोलीस कमिशनर यांनीच विधानसौधमध्ये कार्यक्रम घेऊन नये असे म्हटले होते, पण मुख्यमंत्री कार्यालयातून त्यांच्यावर दबाव आणला गेला हे खरे काय? श्रेय घेण्यासाठी अतिघाईने विजयोत्सव आयोजित करायचा व शोकांतिका घडल्यावर पोलीस व प्रशासनातील वरिष्ठांचा बळी द्यायचा असा हा प्रकार आहे.

आयपीएल हे निव्वळ क्रिकेट नसून हा बिझनेस आहे हे काही लपून राहिलेले नाही. सर्वाधिक पैसे व सर्वाधिक टीआरपी हाच उद्देश आहे. टीमचे मालक खेळाडूंना पैसे देऊन विकत घेतात आणि मैदानात चिअर्स गर्ल्सही पैसे घेऊनच नाचतात. या सामन्यांचे प्रक्षेपण करताना टीव्ही चॅनेल्समधील टीआरपीची जीवघेणी स्पर्धा असते. टी-शर्टस, टोप्यांपासून ते व्यापारी जाहिरातींची कोट्यवधींची उलाढाल असते. आयपीए हा खेळ आहे अशी कागदोपत्री नोंद असल्याने त्याच्या उत्पन्नावर कोणताही सरकारी कर नाही. ताकदवान राजकारणी व बडेबडे उद्योगसमूह यांचा आयपीएलशी संबंध असल्याने बाहेर काय घडते, याविषयी त्यांना कोण जाब विचारणार?

sukritforyou@gmail.com
sukrit@prahaar.co.in

मुलांची यंत्रे करणे केव्हा थांबेल?

मायभाषा

डॉ. वीणा सानेकर

अनेक विचारवंतांनी मांडलेल्या शिक्षण विचाराचा आढावा घेताना गांधीजींच्या विचाराकडे मन पुन्हा पुन्हा थबकते आहे. गांधीजी शिक्षणाच्या बौद्धिक अंगापेक्षा सांस्कृतिक, नैतिक अंगाला महत्त्व देतात. मातृभाषेतील शिक्षण हा त्यांच्या शिक्षण विचाराच्या केंद्रस्थानी आहे. राज्यकर्त्यांच्या भाषेला अधीन झाल्याने आपण परक्या भाषेला शरण गेलो. शिक्षणाबाबत गांधीजींची मते ठाम होती. परकी भाषा मुलांवर लादणे म्हणजे त्यांच्यावर अकारण भार लादणे आणि त्यामुळे त्यांचा स्वाभाविक विकास खुंटवणे.

मुलांच्या स्मरणशक्तीचा विकास आणि सर्जनशक्तीचा विकास होण्याकरिता मातृभाषा महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षणाच्या माध्यमाबद्दल गांधीजी म्हणतात, 'अनेकांकडे मातृभाषेतील शब्दसंपत्ती इतकी तोकडी आहे की इंग्रजी शब्द व वाक्ये यांचा आधार घेतल्याशिवाय आपले भाषण पुरे करता येत नाही. मुलांच्या ठिकाणी असलेल्या आंतरिक गुणांच्या प्रकटीकरणात खरे शिक्षण आहे. त्यांची स्वतंत्र विचारशक्ती मारली जाऊन ती यंत्रवत बनणे गांधीजींना धोक्याचे वाटते.

बालशिक्षणाबाबत गांधीजी म्हणतात, 'बालकांच्या शिक्षणातले विषय खरे तर सोप्यात सोपे असायला हवेत पण आपण ते अवघड बनवलेले आहेत. 'किती खरे आहे हे! विषय अवघड नि त्यात ते शिकवण्याची पद्धतदेखील अवघड, असे असल्यावर विद्यार्थी हौसेने शिकतील कसे?

बालशिक्षणाच्या क्षेत्रात आणि मुख्यतः आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी ज्यांनी मूलभूत काम केले आहे अशा ताराबाई मोडक यांची भेट जेव्हा गांधीजींशी झाली तेव्हा त्या भेटीत गांधीजींनी ताराबाईंच्या शिक्षणविषयक प्रयोगांचे कौतुक केले. बालशिक्षणाकरिता भारतीय बैठक तयार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सुचवले. भारतीय समाजाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, परिस्थितीशी मिळतीजुळती शिक्षण व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. शैक्षणिक साधने अशी हवीत जी कुणालाही परवडू शकतील. ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांनी महाराष्ट्रात बालशिक्षणाची जी पायाभरणी केली, तिने एक वेगळा आदर्श निर्माण केला.

मुलांनी हौसेने शिकावे म्हणून शैक्षणिक साधनांचा उपयोग करणे ही एक कला आहे. ती आत्मसात करण्यासाठी शिक्षकांनी प्रयोगशील असणे गरजेचे आहे. तसेच अभिव्यक्ती करण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य देणे गरजेचे आहे. ताराबाई आणि अनुताई यांनी नैसर्गिक गोष्टींचा उपयोग करून, साधनांची निर्मिती करून अध्यापन करण्याचा वस्तुपाठ शिक्षकांना घालून दिला. गोष्ट रचणे, ती सांगणे, बडबडगीते-शिशुगीते म्हणणे, पाने, फुले, शिंपले या सर्वांसकट स्वतःच्या भाषेत व्यक्त होण्याचे मोल खूप मोठे आहे, हा संस्कार मनावर बिंबवणारा शिक्षण विचार जेव्हा समजेल तेव्हा बालवयात आपल्या भाषेचा बळी देऊन पालक मुलांवर परक्या भाषेचे ओझे लादणार नाहीत.

भारतातील पहिली महिला बाऊन्सर

दी लेडी बॉस

अर्चना सोंडे

२९ मे रोजी खडकवासल्याच्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमधून १७ मुलींची पहिली तुकडी खडतर लष्करी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडली. आज असं कोणतंही क्षेत्र नाही जिथे महिलांचा वावर नाही. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने महिला यशाचं शिखर काबिज करत आहेत. महत्त्वाचे नेते, अभिनेते, सेलेब्रिटी यांच्या भोवती आपण एक सुरक्षा 'कडे' पाहतो. यांमध्ये बहुतांश पुरुषांचा समावेश असतो. सुरक्षा करणे ही महिलांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे असा एक समज होता. या समजेला तिने छेद दिला. ती भारतातील पहिली महिला बाऊन्सर बनली, ती महिला 'रक्षक' म्हणजे मेहरुन्निसा शौकत अली.

मेहरुन्निसाचा जन्म उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथील एका मुस्लीम रूढीवादी पारंपरिक कुटुंबात झाला. ती अशा कुटुंबात वाढली जिथे मुलींना घराबाहेर पडण्याची पथक रवानगी नव्हती. तिच्या अब्बान्ना असा विश्वास होता की शिक्षणामुळे मुली बिघडतात. मेहरुन्निसाला मात्र शिक्षण घ्यायचे होते. सैन्यात भरती होण्याचे किंवा पोलीस अधिकारी होण्याचे स्वप्न लहानपणापासून तिने पाहिले होते. बालपणात, तिच्या शिक्षणाची आणि शिकण्याची इच्छा कळल्यानंतर तिच्या वडिलांनी वीज बंद केली आणि पुस्तके जाळण्याचा प्रयत्नही केला. मेहरून्निसाला तिच्या आईचा एकमेव आधार होता.

मेहरुन्निसाला तीन बहिणी होत्या. या साऱ्या बहिणी शिक्षण घेत असतानाच त्यांच्या वडिलांनी त्यांच्या मोठ्या बहिणीचे लग्न केले. आता मेहरुन्निसाची पाळी होती. वयाच्या १२ व्या वर्षी मेहरुन्निसाच्या वडिलांनी तिच्यासाठी मुलगा शोधण्यास सुरुवात केली. मेहरुन्निसाचे लग्न होणार होते, परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच होते. तिला टायफॉइड झाला आणि काही काळ तिने अंथरुणावर झोपून घालवला. आजारपणानंतर तिला स्वतःचे जीवन चांगले बनवण्याची प्रेरणा मिळाली. दरम्यान मेहरुन्निसाच्या आईने, मेहरुन्निसाच्या वडिलांना आपल्या मुलींच्या शिक्षणासाठी राजी केले.

मेहरुन्निसाने एनसीसी कॅडेट म्हणून प्रवेश केला कारण तिला नेहमीच पोलीस अधिकारी म्हणून काम करायचे होते. तिने पोलिसात नोकरी मिळविण्यासाठी फिटनेस आणि कराटेचे प्रशिक्षण घेतले. जेव्हा तिला कळले की दिल्लीला महिला बाऊन्सरची आवश्यकता आहे, तेव्हा तिने अर्ज केला. तिची महिला बाऊन्सर म्हणून निवड झाली.

जेव्हा मेहरुन्निसाला कामात अडचणी आल्या तेव्हा तिचा संघर्ष पुन्हा सुरू झाला. तिने नमूद केले की, त्यावेळी बाऊन्सरऐवजी महिला सुरक्षा रक्षक हा शब्द वापरला जात होता. पुरुष बाऊन्सरना मान मिळत असे, तर महिला बाऊन्सरना भेदभाव सहन करावा लागला. मेहरुन्निसावर वाईट टीका आणि शेरेबाजी केली जायची; परंतु तिने हळूहळू तिच्या कामाने, ताकदीने आणि शिक्षणाने या क्षेत्रात तिच्या विरोधात असलेल्या प्रत्येकाला चांगले उत्तर दिले.

२००४ मध्ये 'इंडियन आयडॉल' टीमच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारल्यानंतर, मेहरुन्निसाचे आयुष्य पूर्णपणे बदलले. एक महिला बाऊन्सर म्हणून तिला लोक ओळखू लागले. समाजात तिला मान मिळू लागला. मेहरुन्निसा आता मर्दानी बाऊन्सर्स आणि डॉल्फिन सिक्युरिटी सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी चालवत आहे. तिने अमिताभ बच्चन, प्रियांका चोप्रा, राणी मुखर्जी, रणबीर कपूर आणि दीपिका पदुकोण यांच्यासह अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींना सुरक्षा प्रदान केली आहे.

मेहरुन्निसा शौकत अली ही देशातील पहिली महिला बाऊन्सर आहे. मेहरुन्निसा दिल्लीतील हौज खास गावातील सोशल नावाच्या लोकप्रिय कॅफेमध्ये काम करते. खासगी कार्यक्रमांसाठी आणि प्रसिद्ध लोकांसाठी, ज्यात बॉलिवूडमधील आघाडीच्या सेलिब्रिटींचा समावेश आहे, त्यांना ती संरक्षण देते. ती पबमधील भांडणे सोडवण्यात, बेकायदेशीर ड्रग्ज ओळखण्यात आणि महिला ग्राहकांच्या सुरक्षेवर लक्ष ठेवण्यात तज्ज्ञ आहे.

नेहमीच असे मानले गेले की, महिला स्वतःचे संरक्षण करू शकत नाहीत. त्यांना पुरुषाची गरज आहे. तथापि, या सर्व रूढीवादी विचारसरणीला मोडून काढत मेहरुन्निसाने हे सिद्ध केले आहे की, महिला स्वतःचे संरक्षण करू शकतात आणि इतरांनाही सुरक्षा प्रदान करू शकतात. मेहरुन्निसाच्या कुटुंबाची विचारसरणीही बदलली आहे आणि समाजही त्यांच्याकडे आदराने पाहतो. मेहरुन्निसाने बाऊन्सर म्हणून काम करणे ही देखील आदराची बाब आहे. इतर महिलांनीही या क्षेत्रात नोकरी करावी अशी तिची इच्छा आहे. कोणत्याही नवीन क्षेत्रात काम करताना अडचणी येणार. प्रस्थापित व्यवस्था सहज स्वीकार करत नाही. अशा वेळी न डगमगता पाय घट्टपणे रोवून उभं राहणे महत्त्वाचे. मेहरुन्निसा खंबीरपणे उभी राहिली. देशातील पहिली महिला बाऊन्सर म्हणून उदयास आली. तिच्यामुळे हे क्षेत्र महिलांसाठी खुले झाले. खऱ्या अर्थाने मेहरुन्निसा लेडी बॉस आहे.

भिंत...

मोरपीस

पूजा काळे

कविता मानवी मनाचे प्रतिबिंब दर्शवितात. एखाद्या गोष्टीचा तळ गाठल्याने अंतर्मनाला जे उमगतं ते स्वच्छ पारदर्शक असतं, अन्यथा ठरवून लिहिता येण्यासारखं काही नसल्याने विषय भरकटतो. आज प्रवाहासोबत चालणाऱ्या मानवनिर्मित भिंतीना डावलून चालायचं नाही. त्यांनाही न्याय द्यायला हवा! क्वचित नियंत्रित पण डळमळलेली मनाची भिंत जमीनदोस्त होण्यापूर्वी क्षणात टेकू द्यायला हवा. सुरक्षिततेच्या दृष्टीने भिंतीच्या उपलब्धी निकालाची हमी देतीलही, पण इथं प्रत्येकाची दुःखाची जातकुळी वेगळी असल्याने दुःखाच्या रेषा छेदत जाणारी भिंत आतल्या आत घुसमट सहन करतेय. "एका छताखाली बहु दरवाजे... भिंती आड लपते दुःख या थोर मानवाचे." प्रत्येक गोष्टीला स्वतःचे सौंदर्य असल्याने ते पाहण्याची नजर असावी लागते. कारण सद्यस्थितीत माणसांचे चेहरे, दिवसाउजेडी रात्रीच्या गूढ अंधाराचे भकास चित्र डोळ्यांसमोर उभे करतात. भिंतीपल्याड तिची आर्त हाक घुमत असताना, माझ्यातले सुप्त मन जागे होते, "भिंतींना आधार भरवशाचा, कोलमडण्यापूर्वी सावरण्याचा..." दोन देशांच्या, दोन धर्माच्या भिंतीपेक्षा कडेलोट करणाऱ्या मानवीय भिंती जास्त त्रासदायक असल्याने त्याच्या पलीकडे पाहायला हवं. एका कवितेनं मी आत्ममग्न झाले. आपण जगाच्यापुढे, कितीही गेलो तरी, अनामिक भिंत आपला पिच्छा सोडणार नाही..

नवनवीन अनुभव देणारा ट्रेनच्या प्रवासातला आजचा दिवसही तसाचं उत्साही. डब्यांच्या या चालत्या-बोलत्या विश्वात सुखदुःखाच्या सीमित रेषा पाहावयास मिळतात. संध्याकाळी परतताना भय्याकडून घेतलेल्या भेळेचा हा किस्सा...

भय्याकडून भेळ घेताना ती गुंडाळलेल्या कागदावर माझी नजर पडली. त्याला थांबवत

म्हटलं... " ये भेळ बांधने के लिए तुझे कोई दुसरा कागद नही मिला क्या? काय झालं त्याला कळलं नव्हतं. माझ्या हिंदी भाषेने तो जास्तचं गोंधळात पडला आऽऽऽ वासून पाहत राहिला. अनामिक असलेली आणि बरोबर नावाच्या जागी फाटलेली मराठी कविता त्या कागदावर होती. मराठी साहित्य असं रद्दीत पाहिलं की दुःख होतं मनाला, पार गलबलत. पेपरवरील कविता वाचल्या वाचल्या तिचा गर्भितार्थ समजू लागला. भिंत उजळू लागली. कवितेत प्रतिकात्मक रूपात वापरलेली भिंत म्हणजे ती आणि ती म्हणजे भिंत यातला वाच्यार्थ जाणवला. पुढे भावार्थ सोपा झाला समजायला. कवितेला भिंत हे शीर्षक देऊन मी स्वतः बाईच्या आसपास असणाऱ्या तमाम भिंती चाचपडू लागले...

अनामिका कविता अशी होती...

भिंत! करत नाही कुठलाच विरोध तुमच्या

मर्जीनुसार स्वतःला सजवते,

तुमचं सुंदर घराचं देखणं स्वप्न भिंत तुमच्या सहमनात रुजवते...

भिंतीच्या गुळगुळीतपणावरून भिंतीच्या अंतरातल्या अनंत भेगा दिसत नाहीत कुणाला वरून.

भिंत सोसते घाव, रूतणारे खिळे जेव्हा शिरतात आरपार...

नकोशी जळमटं अन् मृत तसवीरींवरचे प्रेम अपार..

अवचित तिचे पोपडे पडतात तेव्हा तात्पुरती डागडुजी अन् तसाच गिलावा...

टेकू लाऊन भिंत खचते सरताना मायेचा धरुन ठेवणारा ओलावा...

अवास्तवाचे ओझे खांद्यावर घेत अवजड भिंत काही उगाचंच खचत नाही...

ती आधार, हक्काची जागा आडोसाही. ती प्रेममाया, दिलासाही.

लक्षात ठेवा भिंत टिकून राहिली तरच उरतो कोनाडा. अन् कोनाड्यातच लागतो दिवा...

'ती'च्या शोधार्थ निघालेली मी वळून माझ्यापाशीचं आले. म्हणजे एक स्त्री म्हणून समस्त स्त्रियांच्या भावना जवळपास सारख्याच होत्या. स्त्रीच्या जगण्याशी नितांत बांधिलकी जोपासणारी ही अतिउत्तम कविता. वाट्याला आलेलं दुःख टाळता येणार नाही, ते सहन करता येण्यासाठी जगणं नित्य राखणही क्रमप्राप्त असल्याचं अमूल्य सूत्र मांडते. या भावकवितेत कवी कल्पनेला बहर येतो. कवितेत एकही अलंकार नाही, तरीही ती उजवी ठरते अगदी बाईच्या कर्तृत्वासारखी. शब्दांना भिंतीच्या कोंदणात बसवून हवे असलेले भाव अलवारपणे मांडत कविता पंख पसरते. तरलता आणून भावनांचे कल्लोळ उठवते. भिंतीसम स्त्रीत्वाच्या कंगोऱ्यांना हात घालत, विशिष्ट्य दालन उघडली जातात. दया, माया, शांती, धीरोदत्त, लढाऊ, कर्तबगार, क्षमाशील स्त्रीतत्व अंगभूत रत्न लेखणीतून अवतरतात. भिंत प्रधान बाईला प्रसंगानुरूप लढण्याचं सामर्थ्य प्रदान करतात. त्यामुळे ही भावगर्भित कविता चौकटीतली न राहाता पाश ओलांडते. निर्व्याज मनाने उभी असलेली भिंत, घर स्वप्नातले मनात रुजवते. वरवर असलेल्या अंतरंगातल्या भेगा दिसत नाहीत कुणाला. सुखाच्या लिंपणामध्ये दुःखाची दुभंगलेली रेषा कळून येत नाही. मायेचा ओलावा धरून ठेवणारी भिंत म्हणजे ती घाव सोसते निमूटपणे. बाई काय किंवा भिंत काय!

कुठल्या जातीची, दगडाची, शेणकुडाची न राहाता, केवळ जोडण्याचं काम करते. त्यासम तिला म्हणजे भिंतीला बळ येते. चेहऱ्यावर भाव न दर्शवता, मायेच्या ओलाव्यात सगळी वेदना पुसून टाकते ती. ती आहे म्हणून चाललंय. जाता जाता बाईपणाच्या व्यथा भिंतीतून अधोरेखीत करत असताना 'ती'चं असणं बरंच काही सांगून जातं. आई, ताई, माई, बायको, मुलगी नावाच्या बाळगुटी आयुष्याचा भाग असतात. हक्काचा आधार असलेला एक कोनाडा सोबतीला असल्याने तिथं कायमचं प्रेमाचं वास्तल्य पाहायला मिळतं, या वैशिष्ट्यांमुळे भिंतीपेक्षा ती निराळी नाहीच. अनामिका नावाने आलेली कविता उंची गाठते. एक भावोत्कट कविता जुन्याचं लव्याजम्यानिशी नव्या पेहरावात येताना आपल्या पसंतीस उतरते. संवेदना व्यक्त करताना, जगण्याचा आकांत सांगणं ही या कवितेची जमेची बाजू आहे. संकटात अभेद्य भिंत आणि घराला घरपण देणारी स्त्री कायमचं तटस्थ असल्याने तिच्यातल्या दृष्टीची, आपलेपणाच्या आंतरसंबंधाची अडगळ समृद्ध होताना दिसते.

RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२०२२/८४६०६. राणे प्रकाशन प्रा. लि. के लिए मुद्रक, प्रकाशक **मनिष तुकाराम राणे** द्वारा राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९/११/२ तथा ११/३, वारजे फ्लायओव्हर के सामने, राष्ट्रीय महामार्ग वारजे नाका, पुणे -४११०५८ से मुद्रित, तथा प्रहार कार्यालय, एन-४२-सीबी-३/१४/३ डॉ. हेडगेवार नगर, एमएसईडी कार्यालय के पास, दत्त मंदिर, सिडको, नाशिक - ४२२००४ से प्रकाशित. दुरध्वनी : ०२५३-४०६३३९४. संपादकीय सल्लागार : **नारायण राणे**, संपादक : **डॉ. सुकृत खांडेकर*** (पीआरबी अधिनियम के अंतर्गत समाचारों के चयन के लिए उत्तरदायी.) © सर्वाधिकार सुरक्षित.